जिल्हा शैक्षणिक सातत्यपूर्ण व्यावसायिक विकास संस्था (DIECPD), पुणे येथील प्रशिक्षण कक्षाच्या बांधकामास प्रशासकीय मान्यता देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
शासन निर्णय क्रमांकः डायट-२०१९/प्र.क्र.२०/प्रशिक्षण
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक: २० मार्च, २०१९

शासन निर्णय :

जिल्हा शैक्षणिक सातत्यपूर्ण व्यावसायिक विकास संस्था (DIECPD), लोणी काळभोर, ता. हवेली, जि. पुणे या कार्यालयाचे स्थलांतर दिनांक १/११/२०१८ पासून उर्दु अध्यापिका विद्यालय, ३८४ भवानी पेठ, पुणे-२ येथे करण्यात आले आहे. सद्यस्थितीत जिल्हा शैक्षणिक सातत्यपूर्ण व्यावसायिक विकास संस्था (DIECPD), पुणे यांना स्थलांतरीत झालेल्या जागेमध्ये नवीन प्रशिक्षण कक्षाचे बांधकाम करण्यासाठी शिक्षक प्रशिक्षण योजनेअंतर्गत उपलब्ध असलेल्या निधीतुन रु. ५८.९९ लाख इतका खर्च करण्यास खालील अटी व शर्ती नुसार प्रशासकीय मंजूरी देण्यात येत आहे.

प्रशासकीय मान्यतेच्या अटी व शर्ती खालीलप्रमाणे आहेत:-

१. तरतूद उपलब्ध झाल्याशिवाय प्रत्यक्ष बांधकामास सुरूवात करू नये.
२. ढोबळमानाने करण्यात आलेल्या तरतूदीचे सविस्तर अंदाजपत्रक तयार करून सदर अंदाजपत्रकांना सक्षम प्राधिकरणाचे तांत्रिक मान्यता घेण्यात यावी.
३. सदर बांधकामाकरिता आवश्यकता असल्यास महानगरपालिका, तत्सम प्राधिकरणाची मंजूरी/ नाहरकत प्रमाणपत्रे बांधकाम सुरू करण्यापूर्वी प्राप्त करण्यात यावीत.
४. सदरची कामे कार्यकारी अभियंता समग्र शिक्षा अभियान जिल्हा परिषद पुणे , यांच्याकडून करून घ्यावीत.
५. सदर कामांचा खर्च शिक्षक प्रशिक्षण या योजनेअंतर्गत उपलब्ध असलेल्या तरतूदीतून भागवावा.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २०१९०३२०१७३४२४६५२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Baban Ranganath Mali

Digitally signed by Baban Ranganath Mali
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=School Education And Sports Departrment, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=058a3365edca1bab7b5a512fa9b602a739d12b55819b89fd7154a7a28ccbaa1e, serialNumber=d2974b67a90018e618d5e11ffd00382f063542cc3d866753cfd5a4ad652b1908, cn=Baban Ranganath Mali
Date: 2019.03.20 17:43:24 +05'30'

(बी. आर. माळी)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत :

१) आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे.
२) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) १/२ महाराष्ट्र राज्य, मुंबई/ नागपूर
३) महालेखापाल (लेखा परीक्षा) १/२ महाराष्ट्र राज्य, मुंबई/ नागपूर
४) संचालक, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद (विद्या प्राधिकरण), पुणे.
५) सहसंचालक, लेखा व कोषागारे, संगणक कक्ष, नवीन प्रशासकीय भवन, मुंबई.
६) कार्यकारी अभियंता समग्र शिक्षा अभियान जिल्हा परिषद, पुणे
७) कक्ष अधिकारी, (अर्थसंकल्प) शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
८) निवड नस्ती, प्रशिक्षण.